International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.10 No.2 November – December 2022

# प्रशासकीय सुधारणा आणि जागतिकीकरण

**डॉ. आकाश शेषराव बांगर**
*संशोधक विद्यार्थी, आदर्श महाविद्यालय, हिंगोली*
*Corresponding Author - डॉ. आकाश शेषराव बांगर*
**DOI - 10.5281/zenodo.7751326**

**प्रस्तावना:**

बदल हा सृष्टीचा नियम आहे. या भुतलावर इतर सर्व घटका प्रमाणेच प्रशासनाला देखील बदलास सामोरे जावे लागते. ते तरी कसे अपवाद राहतील. कोणत्याही देशातील प्रशासन व्यवस्थेला कार्यक्षम गतिशील व पारदर्शक बनविण्यासाठी प्रत्येक सरकार काही सुधारणा या यंत्रणेमध्ये करत असते. त्यामुळे देशातील जनतेला सामाजिक आर्थिक सुविधा योग्य पद्धतीने व कमीत कमी वेळात प्रभावीपणे अंमलबजावणी आणता येतील. लोक प्रशासनाचा मुख्य उद्देशच मुळी मानवी समाजाचा सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास करणे हा आहे. स्वातंत्र्यानंतर प्रशासकीय संस्थांची सरचना, कार्यपद्धती आणि प्रक्रिया यामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत, नाही असे नाही. शिवाय आजपर्यंत दोन प्रशासकीय सुधारणा आयोग नामवंत व विशेषण व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या मार्गदर्शक व शिफारशीचा विचार करता प्रशासनाला कार्यक्षम व गतिमान करण्यासाठीचे प्रयत्न झालेले आहेत. 1991 नंतर मात्र जागतिकीकरणाच्या कालखंडात मोठ्या प्रमाणावर विज्ञान-तंत्रज्ञानाच्या सोबतच नवनवीन आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रशासनाला काळानुरूप बदल स्वीकारावेच लागलेली आहेत. कारण रूढीवादी किया परंपरावादी प्रशासन पद्धतीला दूर सारून अभिनय व परिवर्तनवादी अनुकुल तेत उदासीनता दाखविणे आज एकविसाव्या शतकात तरी समय नाही. त्यामुळे बदलत्या काळानुसार प्रशासकीय क्षमता अधिक व्यापक बनविण्याचा प्रयत्न करणे हे सूत्र प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्याच्या मुळाशी आहे.

**उद्देश:**

१. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शासकीय सुधारणांचे अवलोकन करणे.

२. जागतिकीकरणानंतरच्या कालखंडात प्रशासकीय सुधारणांचा आढावा देणे.

**संशोधन पध्दती:**

प्रस्तुत संशोधनात्मक शोध निबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला आहे. त्यासाठी दुय्यम तथ्य संकलन पध्दतीचा उपयोग केला आहे. दुय्यम तथ्ये संकलनासाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील संदर्भग्रंथ इंटरनेट सेवा इ. माध्यमांचा उपयोग केला आहे.

**तथ्य संकलन:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम तथ्य संकलनाचा उपयोग केला आहे. त्यात संदर्भग्रंथ, पुस्तके, वृत्तपत्रे, इंटरनेट इ. चा उपयोग केला आहे.

जागतिकीकरणानंतर निर्माण झालेल्या विविध आव्हानांचा सामना करण्यासाठी प्रशासनाला अनेकविध सुधारणा करण्याकडे विशेष लक्ष देणे अत्यंत गरजेचे होते. त्यामुळे प्रशासनाला अधिकाधिक लक्ष भिमुख, परिणाम भिमुख बनविण्याचा प्रयत्न झालेला आहे. यादृष्टीने नवनवीन संकल्पना, तत्वाचा स्वीकारही केला आहे. त्यामध्ये नवलोक व्यवस्थापन, ई गवर्णन्स, सुशासन, गुणवत्ता, जबाबदेयीता, पारदर्शिता इत्यादी संकल्पनां समाविष्ट - करून या पद्धतीने कार्य केली जात आहे. परंतु यामुळे खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक खाजगी भागीदारी, निर्गुंतवणूक यासारख्या अव्यवहार्य व नफेखोर वृत्तीला मात्र दुजोरा दिला जात आहे. हे कल्याणकारी समाजव्यवस्थेला दूर करून भांडवलशाही व कंपनी आणि खाजगी व्यवस्थेला ही यंत्रणा सोपविण्याचे कारस्थान याकाळात व भविष्यात होईल अखिल स्थिती दिसते आहे. आणि याचे वाईट दूरगामी परिणाम समाज व्यवस्थेवर होणार आहेत.

**प्रशासकीय सुधारणाचा आढावा:**

भारतामध्ये वेगवेगळ्या राजवटीच्या कार्यकाळात त्यांनी ती प्रशासन व्यवस्था राबविली व त्यात बदल किंवा सुधारणा घडवून कारभार केलेला आहे, हे देखील एक प्रशासकीय सुधारण्याचे रूप आहे. यामध्ये राजेशाही संस्थाने आणि ब्रिटीश काळाचा विचार करता त्या त्या काळात त्याचे पाईक होऊन कार्य केलेली आहेत. विशेषता भारतामध्ये ब्रिटिशांची सत्ता ही मोठ्या प्रमाणावर प्रशासकीयदृष्ट्या प्रभावशाली राहिली आहे. असे म्हटल्यास चुकीचे होणार नाही. कारण त्याच ब्रिटिश प्रशासन व्यवस्थेनुसार आजही आपला कारभार चालतो आहे.

भारतामध्ये ब्रिटिश राजवट असताना भारतातील प्रशासकीय सुधारणेसाठी यचीसण आयोग ली आयोग इस्लींग्टन आयोग नेमलेले होते.. याशिवाय लोकसेवा विकासासाठी म्हणून 1918 मध्ये मॉंटेग्यू चेम्सफर्ड अहवाल समोर आला.

त्यानंतर 1947 मध्ये सचिवालय पुनर्घटन समिती, 1948 मध्ये उद्योगपती कस्तुरबाई लालाभाई यांच्या अध्यक्षतेखाली खर्चिक व्यवहार समिती, 1949 मध्ये आयंगर समिती त्यांनी आपला प्रशासकीय सुधारणा संबंधीचा अहवाल दिलेला होता. मार्च 1951 मध्ये ए. डी गोरवाला समितीने लोक प्रशासनावर अहवाल दिला. यांनी प्रशासनातील सर्वोत्तम महत्वपूर्ण विषयाला प्राधान्यक्रम देऊन मुख्यता परिणामासाठी अधिकचा खर्च न करता इमानदार, सत्यनिष्ठ आणि निष्पक्ष कर्मचारी असावेत अशी शिफारस केली मंत्री, आमदार तसेच प्रशासन यांच्याकडे उत्तरदायित्वाची भावना असावी अशी शिफारस केली होती. यानंतर 1952 मध्ये पॉल एप्पल बी लोकप्रशासनाचे अमेरिकन तज्ञ यांना भारताने प्रशासकीय सुधारण्यासाठी पाचारण केले होते. ते म्हणतात भारत जगातील ज्या 10 - 12 देशाच्या यादीत समाविष्ट आहे, जेथे लोकप्रशासन मोठ्या प्रमाणात संघटित आणि विकसित आहे. असे गौरवोद्गार त्यांनी प्रशासना संदर्भात काढले होते.

1962 मध्ये के संथानम समितीने आपल्या शिफारशी मध्ये प्रथम आणि द्वितीय श्रेणी अधिकारी वर्गासाठी भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी 1964 मध्ये केंद्रीय सतर्कता आयोग निर्माण केला. याशिवाय यामध्ये महत्त्वपूर्ण एक बाब म्हणजे लोकपाल नावाची संस्था याचा विचार या अहवालाद्वारेच आलेला आहे. यानंतर 5 जानेवारी 1966 मध्ये पहिला प्रशासकीय सुधारणा आयोग श्री मोरारजी देसाई यांच्या अध्यक्षतेखाली नेमला गेला. आयोगाने केलेल्या शिफारशी चा उद्देश मुळात नैतिक प्रयोजन, सातत्यता, कृत्रिमपणा आणि परिवर्तन यावर मुख्य लक्ष केले होते. परंतु सरकारची नकारात्मक इच्छाशक्ती तथा नोकरशाहीची उदासीनता, रूढीवादीता या कारणामुळे पहिल्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसी कागदावरच राहिल्या आहेत.यानंतर 31 ऑगस्ट 2005 मध्ये दुसरा प्रशासकीय सुधारणा आयोग श्री वीरप्पा मोईली यांच्या अध्यक्षतेखाली नेमला गेला. विशेषतः हा आयोग जागतिकीकरणानंतरच्या कार्यकाळात नेमला गेलेला होता. त्यामुळे या आयोगाच्या शिफारशी ला महत्त्वपूर्ण स्थान आहे. जागतिकीकरणाच्या युगात प्रशासकीय

यंत्रणेला सक्षमपणे येणाऱ्या आव्हानांचा सामना करावयाचा आहे. दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या महत्वपूर्ण शिफारशी मध्ये नोकरशाहीसाठी 14 वर्षे सेवा केल्यानंतर त्यांचे परीक्षण करून त्यांच्या मजबूत आणि कमजोर घटकावर विचार केला जावा, आणि वीस वर्षे सेवा झाल्यानंतर यापुढील सेवेसाठी योग्य आहेत किंवा नाही याचा आढावा घेतला जावा अशी शिफारस केली होती. याचा मूळ उद्देश म्हणजेच सरकारी नोकर कपात करून खाजगी कंपनी यांच्या हाती ही यंत्रणा सोपवण्याचे षड्यंत्र या दुसऱ्या प्रशासकीय सुधारणा आयोगाने केलेले दिसते. या आयोगाचा कालावधी 2009 मध्ये संपलेला आहे. कोणताही आयोग समितीच्या शिफारसी ह्या त्याकाळातील सरकार कशा पद्धतीने स्वीकारते आणि अंमलबजावणीत आणते हे आजपर्यंतच्या 72 73 वर्षाच्या कार्यकाळात भारतीय जनतेने पाहिलेले आहे, यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही.

**जागतिकीकरणाचे प्रशासकीय सुधारणावरील परिणाम:**

नागील पंचवीस तीस वर्षाच्या कालावधीमध्ये अशी कुठलेच क्षेत्र जागतिकीकरणाच्या प्रभावापासून मुक्त राहिली नाही. त्याला प्रशासन कसे अपवाद, त्यामुळे प्रशासनावर देखील त्यांचे अनेक परिणाम झालेले आहेत. शिवाय प्रत्येक देशाच्या ध्येय धोरणावर मोठ्या प्रमाणावर सामाजिक आर्थिक दृष्ट्या विघातक स्वरूपाचे परिणाम होत आहेत यामध्ये जे देश विकसित आहेत किंवा लोकसख्येने व आकाराने छोटी आहेत येथे काही प्रमाणात फरक कमी अधिक जाणवेल. परंतु भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात आकाराने व लोकसंख्येने मोठे असलेल्या देशात काय प्रचिती येत आहे हे मागील 25 30 वर्षापासून जनता पाहत आहे. आज स्थितीला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आणि माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटातून महाराष्ट्र राज्याच्या सीमा अंधुक होऊन राष्ट्राचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे. कल्याणकारी भूमिकेतून माघार घेऊन राज्याने कायदा व सुव्यवस्था सांभाळावी असा दबाव तयार होत आहे. यामुळे लोकशाही संसदीय शासन पद्धती असणाऱ्या देशात जागतिक दबावशाही राजवट प्रस्थापित होत आहे. हे सद्यस्थितीवरून तरी लक्षात येते. या जागतिकरणाचे प्रशासनावर व प्रशासकीय धोरणावर काय परिणाम होत आहेत ती पुढील काही प्रमाणे सांगता येतील.लोककल्याणकारी संकल्पनेला पूर्णविराम, बाजारीकरण आणि

खाजगीकरणाला भाव देणे, लोकप्रशासनाचे नकारात्मक भूमिकेत वार, सार्वजनिक क्षेत्र व उपक्रमांमध्ये निगुंतवणूक प्रकरणात वाढ, शासकीय संरचनेत बदल सुधारणा मागील पंचवीस तीस वर्षाच्या कालावधीमध्ये अशी कुठलेच क्षेत्र जागतिकीकरणाच्या प्रभावापासून मुक्त राहिली नाही. त्याला प्रशासन कसे अपवाद, त्यामुळे प्रशासनावर देखील त्यांचे अनेक परिणाम झालेले आहेत. शिवाय प्रत्येक देशाच्या ध्येय धोरणावर मोठ्या प्रमाणावर सामाजिक आर्थिक दृष्ट्या विघातक स्वरूपाचे परिणाम होत आहेत यामध्ये जे देश विकसित आहेत किंवा लोकसख्येने व आकाराने छोटी आहेत येथे काही प्रमाणात फरक कमी अधिक जाणवेल. परंतु भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात आकाराने व लोकसंख्येने मोठे असलेल्या देशात काय प्रचिती येत आहे हे मागील 25 30 वर्षापासून जनता पाहत आहे. आज स्थितीला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून आणि माहिती तंत्रज्ञानाच्या स्फोटातून महाराष्ट्र राज्याच्या सीमा अंधुक होऊन राष्ट्राचे सार्वभौमत्व धोक्यात आलेले आहे. कल्याणकारी भूमिकेतून माघार घेऊन राज्याने कायदा व सुव्यवस्था सांभाळावी असा दबाव तयार होत आहे. यामुळे लोकशाही संसदीय शासन पद्धती असणाऱ्या देशात जागतिक दबावशाही राजवट प्रस्थापित होत आहे. हे सद्यस्थितीवरून तरी लक्षात येते. या जागतिकरणाचे प्रशासनावर व प्रशासकीय धोरणावर काय परिणाम होत आहेत ती पुढील काही प्रमाणे सांगता येतील.लोककल्याणकारी संकल्पनेला पूर्णविराम, बाजारीकरण आणि खाजगीकरणाला भाव देणे, लोकप्रशासनाचे नकारात्मक भूमिकेत वार, सार्वजनिक क्षेत्र व उपक्रमांमध्ये निगुंतवणूक प्रकरणात वाढ, शासकीय संरचनेत बदल सुधारणा, लोक निवड सिद्धातास चालना, सरकारचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण करणे, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रांमध्ये भागीदारीत वाढ लोकसहभागाला महत्त्व देणे, शासनास अधिक पारदर्शक बनविणे वरील काही चांगले व अधिकची बाजारकेंद्रित व्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न या जागतिकीकरणाच्या प्रक्रियेद्वारे होत आहेत. याला अँथोनी गिडल्स नावाच्या विचारवंतांनी म्हटले की, जागतिकीकरण म्हणजे जगभरात सामाजिक संबंधाचे सघनिकरण घडून येणे होय.

**निष्कर्ष** :

प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या बाबतीमध्ये अभ्यासपूर्वक चिंतन केले असता प्रकर्षाने जाणवते की दोनच प्रशासकीय सुधारणा आयोग आजपर्यंत नेमली गेली का? या बाबीकडे

जाणीवपूर्वक दुर्लक्षिले गेले आहे हे येथे दिसून येते. जागतिकीकरणाच्या काळात मुख्य प्रवाहात राहूनच त्या दिशेने आगेकूच करणे आता गरजेचे झाले आहे. त्याशिवाय दुसरा कुठलाच पर्याय आज तरी उरलेला नाही. त्यामुळे या प्रक्रियेत काही समाजहितासह, राष्ट्र हितासाठी सकारात्मक बाबी ज्या त्या राष्ट्राच्या एकंदरीत परिस्थितीचा विचार करून देश पातळीवरून राबविल्यास निश्चितपणे त्याचे चांगले परिणाम समोर येतील. परंतु जागतिकीकरण म्हणजे पूर्णता निर्गुतवणूक, खाजगीकरण बाजारीकरण आंतरराष्ट्रीयकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांची मालकी या सर्व बाबी काही प्रमाणात प्रवेश करणारच आहेत. परंतु ज्या देशात अजूनही काही घटक, प्रदेश, वर्गाने विकासाचा गंधही पाहिलेला नाही त्यासाठी धोरणात्मक पातळीवर आणि प्रशासकीय यंत्रणेच्या माध्यमातून विकासाचा प्रवाह प्रवाहित केला जावा. अन्यथा स्वातंर्त्यात आहोत की पारतंत्र्यात आहोत किंवा आमचा देश स्वातंर्त्य झाला होता ? असा स्वप्नवत सवाल जनतेला पडेल, यात मुळीच शंका नाही. त्यामुळे आजही स्वातंर्त्यांच्या 70- 72 वर्षानंतरही विकास योजना, धोरणे हे शेवटच्या घटकापर्यंत पोहोचलेले नाहीत, हे सांगणे जेवढे दुर्देवी आहे तेवढेच प्रत्यक्षात होते हे देखील मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या या काळात प्रशासकीय यंत्रणेत सुधारणा करून निश्चितपणे ग्रासरूटपर्यंत यंत्रणा बदलेल आणि त्याच्या वर्तनात व कार्यक्षमतेत वाढ होऊन ते जबाबदार व सक्षम यंत्रणा बनवून एक विकसित राष्ट्रनिर्माणाला हातभार लावतील हीच अपेक्षा या ठिकाणी व्यक्त करू शकतोत.

**संदर्भसूची** :


१. कटारिया सुरेंद्र, 2011, भारत मे लोकप्रशासन, आर. बी. एस. ए. पब्लिशर्स, जयपुर.

२. बंग के आर 2016, भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

३. पचार प्रकाश, 2010, सार्वजनिक धोरण, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

४. Dahini S., Effect of Globalization and liberalization on Public Administration- www-politicalscience notes-com

५. Google.

६. Wikipedia.